| | | | |
|---|---|---|---|
| MHBI160000322019 | दाखल दिनांक | : | ०३.०१.२०१९ |
| | नोंदणी दिनांक | : | ०७.०१.२०१९ |
| | निकाल दिनांक | : | ०४.०७.२०२६ |
| | कालावधी | | वर्षे ०७ महिने ०५ दिवस २८ |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, शिरुर कासार, जि.बीड यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी : अक्षय सं. जगताप)**

(न्यायनिर्णय : दिनांक ०४ जुलै २०२६)

**नियमित फौजदारी खटला क्र.०८/२०१९**

**निशाणी क्र.८८/ब.**

प्रथम खबर अहवाल तपशील
गुन्हा नोंद क्र. : ४४/२०१८
पोलीस ठाणे : शिरुर कासार, जि.बीड.

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत–पोलीस ठाणे शिरुर कासार,<br>जि.बीड. |
| सरकारी अभियोक्ता | श्री.डी.एम. पाटील |
| **आरोपी** | **१. विनोद पांडुरंग पवार**<br>वय : २४ वर्षे,<br>**२. राजेश भाऊसाहेब खामकर**<br>वय : २४ वर्षे,<br>**३. उमेश ऊर्फ उमाकांत सर्जेराव सुरवसे**<br>वय : २७ वर्षे,<br>**४. अमोल सुभाष काटे**<br>वय : २९ वर्षे,<br>**५. परमेश्वर ऊर्फ प्रमोद एकनाथ काटे**<br>वय : ४० वर्षे,<br>**६. भरत शिवाजी काटे**<br>वय : ३० वर्षे,<br>**७. राजेंद्र ऊर्फ राजु राम काटे**<br>वय : २८ वर्षे,<br>सर्व रा. सुतारनेट, ता. शिरुर कासार, जि. बीड |
| आरोपीचे विधीज्ञ | श्री. बी. ई. येळे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०३.०३.२०१८ |
| प्रथम खबर अहवाल | ०४.०३.२०१८ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०३.०१.२०१९ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | ११.०९.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ११.०९.२०१९ |
| निकाल राखुन ठेवल्याचा दिनांक | ०४.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०४.०७.२०२६ |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनवर मुक्त झाल्याचा दिनांक | दोषारोपाचे कलम | आरोपीस शिक्षा किंवा निर्दोष मुक्त केले. | शिक्षा | **Period of detention undergone during trial**. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **विनोद पांडुरंग पवार** | ०५/०३/२०१८ | १९/०३/२०१८ | भादंवि चे १४३, १४७, १४८, ३२७, ४२७, ४५२, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये | दोषारापातुन मुक्त केले | -- | -- |
| २ | **राजेश भाऊसाहेब खामकर** | ०५/०३/२०१८ | १९/०३/२०१८ | वरील प्रमाणे | दोषारापातुन मुक्त केले | -- | -- |
| ३ | **उमेश ऊर्फ उमाकांत सर्जेराव सुरवसे** | ०५/०३/२०१८ | १९/०३/२०१८ | वरील प्रमाणे | दोषारापातुन मुक्त केले | -- | -- |
| ४ | **अमोल सुभाष काटे** | ०५/०३/२०१८ | १९/०३/२०१८ | वरील प्रमाणे | दोषारापातुन मुक्त केले | -- | -- |
| ५ | **परमेश्वर ऊर्फ प्रमोद एकनाथ काटे** | ०४/०६/२०१८ रोजी अटकपुर्व जामीन मंजुर | -- | वरील प्रमाणे | दोषारापातुन मुक्त केले | -- | -- |
| ६ | **भरत शिवाजी काटे** | ०४/०६/२०१८ रोजी अटकपुर्व जामीन मंजुर | -- | वरील प्रमाणे | दोषारापातुन मुक्त केले | -- | -- |
| ७ | **राजेंद्र ऊर्फ राजु राम काटे** | ०४/०६/२०१८ रोजी अटकपुर्व जामीन मंजुर | -- | वरील प्रमाणे | दोषारापातुन मुक्त केले | -- | -- |

## अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | निशाणी क्र. | साक्षी प्रकार |
|---|---|---|---|
| १. | गयाबाई शेषेराव पानसंबळ | ७९ | फिर्यादी |
| २. | शुभांगी भारत पानसंबळ | ८० | जखमी साक्षीदार |
| ३. | भारत शेषेराव पानसंबळ | ८१ | साक्षीदार |

## आरोपी तर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायालया मार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

## मान्य केलेली कागदपत्र

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | ८२ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | ८३ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

## आरोपी तर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायालया तर्फे देण्यात आलेले निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

## मुद्देमालचा तपशील

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

:: **<u>न्या य नि र्ण य</u>** ::

(दिनांक ०४ जुलै २०२६ रोजी घोषीत)

आरोपी क्र.१ ते ७ विरुध्द भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२७, ४५२, ४२७, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे कथन**

२) दिनांक ०४/०३/२०१८ रोजी फिर्यादी गयाबाई शेषेराव पानसंबळ हिने पोलीस स्टेशन शिरुर कासार येथे तोंडी फिर्यादी दिली की, दिनांक ०३/०३/२०१८ रोजी सकाळी ती तिचा मुलगा भरत याचेसह मुंगुसवाडी, ता. पाथर्डी येथे लग्नाला जावुन सायंकाळी ०५.०० वाजता परत आले. त्यानंतर सायंकाळी ०६.०० वाजण्याच्या सुमारास तिचा मुलगा भरत हा शिरुर कासार गावात जातो म्हणुन गेला व ती तिच्या घराजवळील निता भंडारी यांच्या घरी गप्पा मारण्याकरिता गेली. त्यानंतर सायंकाळी ०७.०० वाजण्याच्या सुमारास तिला जोरात ओरडण्याचा आवाज आला. त्यामुळे तिने बाहेर येवुन पाहिले असता तिला आरोपी व ईतर ३५ ते ४० लोक तिच्या घराकडे जाताना दिसले. म्हणुन ती तिच्या घराकडे गेली. त्यावेळी फिर्यादीची सुन शुभांगी व तिचा लहान मुलगा हे रडत होते. आरोपी क्र.१ ते ४ व ईतर इसम हे मोठ्याने शिव्या देत होते. फिर्यादीने आरोपींना काय झाले असे विचारले असता आरोपी क्र.४ याने फिर्यादीस 'तुझ्या पोराने मला उजव्या हातावर दडांवर लोखंडी सुराने मारुन जखमी केले आहे, आम्ही त्याला आता नाही सोडणार' असे म्हणुन सर्व आरोपी शिव्या देवु लागले. त्यामुळे फिर्यादी, तिची सुन व नातु हे त्यांचे घरात गेले. पुढे आरोपींनी फिर्यादीचा घराचा दरवाजा लाथा मारुन उघडला व फिर्यादीच्या घरात गेले. आरोपी क्र.४ याने 'आम्ही तुम्हाला

जिवंत सोडणार नाही' अशी धमकी देवुन घरातील सर्व सामान अस्थाव्यस्त केले. तसेच घराच्या पाठीमागे लावलेली करिज्मा दुचाकीवर दगडफेक करुन तिचे नुकसान केले आणि घरासमोरील बुलेट दुचाकीवर दगड मारुन तिचे नुकसान केले. तसेच आरोपींनी फिर्यादीच्या घरातील लाकडी टेबल, चार फायबरच्या खुर्च्यां यांची मोडतोड करुन नुकसान केले आणि फिर्यादीच्या घरावर दगडफेक केली. आरोपींनी फेकलेला दगड फिर्यादीची सुन शुभांगी हिच्या डाव्या हातावर लागुन ती जखमी झाली. त्यानंतर आरोपी तेथुन निघुन गेले. पुढे फिर्यादीने तिच्या घरात जावुन पाहिले असता फिर्यादीस तिच्या कपाटात ठेवलेली रोख रक्कम ६०,०००/– व सोन्याच्या अंगठ्या दिसल्या नाहीत. सदरचा मुद्देमाल आरोपींपैकी एक आरोपी घेवुन गेला होता.

३) फिर्यादीच्या सदरच्या तोंडी तक्रारी वरुन पोलीस स्टेशन, शिरुर कासार येथे आरोपी क्र.१ ते ७ यांचे विरोधात प्रथम खबर अहवाल क्रमांक ४४/२०१८ भारतीय दंड विधानाचे कलम १४३, १४७, १४८, ३३६, ४२७, ४५२, ३२७, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये नोंदविण्यात आला.

४) सदर गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एम.बी.टाक, यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळी भेट देवुन दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. वैद्यकीय प्रमाणपत्रे हस्तगत केले. त्यांनी आरोपींना अटक केले. साक्षीदारांची तपास टिपणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली. तपासाअंती तपासी अंमलदाराने आरोपी विरोधात दोषारोपपत्र दाखल केले.

**दोषारोप व आरोपीचे म्हणणे**

५) दोषारोपपत्र व दस्तऐवजांचे अवलोकन करुन निशाणी ३४ कडे आरोपी क्र.१ ते ७ यांचे विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम १४३, १४७, १४८, ३२७,

४५२, ४२७, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वयेचा दोषारोप निश्चित केला. आरोपी क्र.१ ते ७ यांना दोषारोप त्यांच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला. आरोपींनी दोषारोप नाकारुन संपरिक्षा करण्याची विनंती केली.

६) आरोपी क्र. १ ते ७ विरूध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या अनुषंगाने पुरावा न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अंतर्गत बयाण नोंदविण्यात आले नाही. त्याबाबतचा आदेश निशाणी १ वर पारित करण्यात आला आहे.

## मुद्दे व निष्कर्ष

७) सरकारपक्षा तर्फे विद्वान विधिज्ञ डी.एम. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ बी. ई. येळे यांचा युक्तीवाद ऐकला. साक्षीपुरावे व संचीकेचे अवलोकन केले. आरोपी पक्षाचा युक्तीवाद व प्रकरणाचे स्वरुप पाहता खालील मुद्दे विचाराधीन येतात. सदर मुद्द्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक ०३/०३/२०१८ रोजी सायंकाळी ०७.०० वाजताच्या दरम्यान मौजे शिरुर कासार, ता. शिरुर कासार येथे फिर्यादीच्या घरी आरोपींनी त्यांचे समान उद्देशपुर्ती करिता जमाव जमवला व त्या जमावाचे सदस्य झाले ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | नाही. |
| २) | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देश पुर्तीकरीता फिर्यादीवर बळाचा वापर केला व हिंसा केल्याची बाब अभियोगपक्षाने शाबित केली आहे काय ? | नाही. |
| ३) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उद्देश पुर्तीकरीता बेकायदेशीर जमाव करुन घातक शस्त्र बाळगुन दंगा केला ही बाब | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | अभियोजनपक्षाने शाबित केली आहे काय ? | |
| ४) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्याचे बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देश पुर्तीकरीता फिर्यादीच्या घरामधील कपाटातील रोख रक्कम व सोन्याच्या दोन अंगठ्या अवैद्यरित्या काढुन घेतली ही बाब अभियोजनपक्षाने शाबित केली आहे काय ? | नाही. |
| ५) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणावर आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशपुर्ती करीता आरोपींनी फिर्यादीचे घरात बेकायदेशिररित्या प्रवेश करुन गृहअतिक्रमण केले ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | नाही. |
| ६) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणावर आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशपुर्ती करीता आरोपींनी फिर्यादीचे घरातील साहित्य व फिर्यादीच्या दोन दुचार्कीची तोडफोड करुन आगळीक केली ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | नाही. |
| ७) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणावर आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशपुर्ती करीता आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करुन सार्वजनिक शांतता भंग घडवुन आणण्यास उद्युक्त केले ही बाब अभियोजन पक्षाने शाबित केली आहे काय ? | नाही. |
| ८) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणावर आरोपींनी त्यांचे बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशपुर्ती करीता आरोपींनी फिर्यादीस धमकी देवून त्यांच्यावर फौजदारीपात्र धाकदपटशा केल्याची बाब अभियोजनपक्षाने शाबित केली आहे काय ? | नाही. |
| ९) | अंतीम आदेश काय ? | आरोपींची दोषारोपातुन मुक्तता करण्यात येते. |

## का र ण मि मां सा

८) अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्याच्या संबंधाने वर नमुद केल्याप्रमाणे एकुण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. अभियोगपक्षाला उर्वरीत साक्षीदारांची साक्ष तपासण्याची वारंवार संधी देण्यात आली. परंतु अभियोगपक्ष सदरील साक्षीदारांना साक्षीकामी हजर ठेवु शकला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा निशाणी १ वर आदेश पारित करुन बंद करण्यात आला. उलटपक्षी आरोपी तर्फे त्याचे बचावात कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा सादर करण्यात आलेला नाही. तर आरोपी तर्फे घटनास्थळ पंचनामा निशाणी ८२ व जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र निशाणी ८३ अन्वये मान्य करण्यात आले आहे.

**<u>मुद्दा क्र. १ ते ८ करिता</u>** –

९) मुद्दा क्र. १ ते ८ हे एकाच घटनेशी निगडीत असल्यामुळे त्यांचे विवेचन एकत्रीत करण्यात येते.

१०) अभियोगपक्षाने आरोपी क्र.१ ते ७ विरुध्द ठेवलेले भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२७, ४५२, ४२७, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वयेचे दोषारोप शाबीत करण्या करीता आरोपींनी समान उद्देश पुर्तीकरिता जमाव जमवुन फिर्यादीच्या घरात बेकायदेशिररित्या प्रवेश केला व फिर्यादीच्या घरामधील कपाटातील रोख रक्कम व सोन्याच्या दोन अंगठ्या काढुन घेतल्या व फिर्यादीचे घरातील साहित्य व फिर्यादीच्या दोन दुचार्कीची तोडफोड केली व फिर्यादीस शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी शाबीत करणे गरजेचे आहे. अभियोगपक्षाने आरोपी क्र.१ ते ७ विरुध्द ठेवलेले दोषारोप शाबीत केले किंवा नाही हे पाहणे करीता अभियोगपक्षा तर्फे आलेल्या तोंडी व लेखी पुराव्याचे सुक्ष्मपणे अवलोकन करणे गरजेचे आहे.

११) अभियोगपक्षा तर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ ही फिर्यादी साक्षीदार असुन साक्षीदार क्र.२ ही जखमी साक्षीदार आहे व साक्षीदार क्र.३ हा फिर्यादीचा मुलगा आहे. साक्षीदार क्र.१ ते ३ यांचे न्यायालया समोरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपी हे त्यांचे गावातील असुन दिनांक ०३/०३/२०१८ रोजी आरोपींनी घराकडे येवुन दगडफेक केल्याचे फिर्यादी साक्षीदार क्र.१ ने कथन केले आहे व साक्षीदार क्र.२ व ३ यांनी आरोपी व त्यांचेत काय घटना घडली होती हे त्यांना माहित नसल्याचे कथन केले आहे. परंतु, सदर साक्षीदाराने आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपास अनुसरुन कथन केले नाही. तसेच फिर्यादीने तिचा फिर्यादी जबाब शाबीत केला नाही.

१२) साक्षीदार क्र. १ ते ३ हे अभियोगपक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने त्यांना न्यायालयाचे परवानगीने उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, अभियोग पक्षास सहाय्यक असे पटलावर काहीही आले नाही. साक्षीदार क्र.१ ते ३ यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपी क्र.१ ते ७ विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपास अनुसरुन कोणतेही कथन केले नाही. परंतु, साक्षीदार क्र. १ ते ३ यांनी त्यांचे पुराव्या दरम्यान आरोपी व त्यांच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य केले आहे.

१३) अभियोगपक्षा तर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र. १ ते ३ यांचे पुराव्यावरून त्याचा तोंडी पुरावा अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही. तसेच आरोपी क्र.१ ते ७ विरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप शाबीत करण्याकामी अभियोगपक्षा तर्फे वर नमूद साक्षीदारा व्यतिरिक्त कोणताही कागदोपत्री पुरावा अथवा इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदवली नाही. त्यामुळे अभियोगपक्ष हे आरोपी क्र.१ ते ७ विरुध्द ठेवलेल्या दोषारोपास अनुसरुन घटने दिवशी आरोपींनी समान उद्देश पुर्तीकरिता जमाव

जमवुन फिर्यादीच्या घरात बेकायदेशिररित्या प्रवेश केला व फिर्यादीच्या घरामधील कपाटातील रोख रक्कम व सोन्याच्या दोन अंगठ्या काढुन घेतल्या व फिर्यादीचे घरातील साहित्य व फिर्यादीच्या दोन दुचाकींची तोडफोड केली व फिर्यादीस शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी सिध्द करण्यात अभियोगपक्षास पुर्णतः अपयश आले आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ८ यास नकारार्थी उत्तरीत केले आहे.

**<u>मुद्दा क्र. ९ बाबतः–</u>**

१४) मुद्दा क्र. १ ते ८ च्या निष्कर्षावरुन आरोपी क्र.१ ते ७ हे त्यांचे विरुध्द ठेवलेल्या दोषारोपातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. ९ चे उत्तरा दाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र. १ ते ७ यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२७, ४५२, ४२७, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये पात्र असलेल्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ ची पुर्तता करण्याकरीता प्रत्येकी १०,०००/– चे वैयक्तीक व जामीनदाराचे बंधपत्र द्यावे.

३. आरोपींचे स्वबंधपत्र रद्द करण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2026.07.04 16:56:42 +0530

शिरूरकासार
दिनांक ०४/०७/२०२६

**(अक्षय सं. जगताप)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, शिरूरकासार.

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 04/07/2026 |
| Transcribed on | : | --------------- |
| Checked & signed on | : | 04/07/2026 |

SAGAR SOPANRAO AJABE

Digitally signed by SAGAR SOPANRAO AJABE
Date: 2026.07.04 17:37:17 +0530

**[Sagar S. Ajabe]**
Stenographer Grade-III